स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा.

संशोधन विषय

“बंजारा जातीच्या सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास”

(विशेष संदर्भ : यवतमाळ जिल्हा)

संशोधक

प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण

समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब,
ता. कळंब जि. उस्मानाबाद.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस. पी. गायकवाड

समाजशास्त्र विभागप्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय,
लातुर जि. लातुर.

जुलै २०१९

“बंजारा जातीच्या सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास”

(विशेष संदर्भः यवतमाळ जिल्हा)

प्रस्तावना :

बंजारा ही वृत्तीवाचक संज्ञा आहे. रानोमाळ भटंकती करणारा बंजारा किंवा गोरमाटी गाणप्रिय असून एक सामुदायिक लोकगण आहे. या जातीची स्वतःची एक स्वतंत्र संस्कृती आहे. भाषा, आचार, विचार, चालीरीती, प्रथा, पंरपरा व पर्वजांकडून संक्रमित झालेले समाजविवेकी विचार आजपर्यंत या जातीने अबाधित राखले आहे. पेहराव, लोकगीते, बोलीभाषा, लोकाचार, लोकभ्रम, लोकसमजुती आणि एकूण लोकसंस्कृतीच्या संदर्भात स्वतंत्रपणा जपणा-या या गोर बंजारा जातीची व्याप्ती ही जगभर पसरलेली आहे.

बंजारा जात मुलतः भटकी असल्याने भटकंती अवस्थेत समग्र शोषण पायात घेऊन भटकंती करीत असताना ज्या प्रदेशाच्या डोंगर द-यात राहत होते, तेथेच वास्तव्यासाठी स्थिरावला, त्या वस्तीला तांडा म्हणून ओळखले जाते. जगातील भटक्या जमातींचा संदर्भ पाहिल्यास उदा. जिप्सी, रोमा हया जमातीशी बंजारा गणाचे भाषिक आणि सांस्कृतिक साम्य आढळते आणि हे साम्य लक्षणीय आहे असे मानले जाते. भारत देशापुरता विचार केला तर महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, कर्नाटक व झारखंड आणि उत्तरीय प्रदेशात देखील बंजारा जात आढळते. भारतात या जातीची लोकसंख्या साधारणतः सात कोटी समान असल्याचे मानले जाते. महाराष्ट्रात गोर बंजारा समाजाचे लोकसंख्येच्या बाबतीत इतर राज्याच्या तुलनेत प्राबल्य असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात सर्वात जास्त बंजारा लोकसंख्या विदर्भात- यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलढाणा, नागपूर, अमरावती, वर्धा, आणि मराठवाडयात नांदेड, लातूर, हिंगोली, औरंगाबाद, जालना या सर्व जिल्हयात प्रामुख्याने जास्त लोकसंख्या असून पश्चिम महाराष्ट्रात तुरळक स्वरुपात आढळून येते.

गोर बंजारा जातीच्या परिवर्तनाची वाटचाल ही ख-या अर्थाने आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर मोठया प्रमाणात झालेली दिसून येते. ब्रिटिशकालीन बंजारा समाज, स्वातंत्र्यपूर्व बंजारा समाज, स्वातंत्र्योत्तर बंजारा समाज आणि विशेष करुन जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या त्रिसुत्रीचे अनुबंध स्विकारताना बंजारा जातीच्या परिवर्तनाची दिशा आणि आजच्या वास्तव जीवन पध्दतीचे अध्ययन करणे खुपच महत्वाचे आहे. एके काळी समृध्द समाज व्यवस्थेपासून खुप दूर असलेला, परिघाच्या बाहेर असलेला बंजारा जात आजच्या या

जागतिकीकरणाच्या प्रवाहात या समाजात परिवर्तन झालेला दिसून येतो. म्हणून बंजारा जातीच्या बदलांच्या पैलूंचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.

भारतात सर्वत्र आढळणारी गोरमाटी ही जमात मूलतः आदिवासी असून वैदिक आचरणाच्या व चातुर्वर्ण्य रचनेच्या ती बाहेर आहे. भटक्या-विमुक्त मूळ आदिवासी लोकगणापैकी बंजारा हा एक लोकगण आहे. त्यांची जीवनपध्दती, आचार-विचार व बोली सुध्दा स्वतंत्र आहे. या समाजातील लोक आपसांत बोलताना स्वतःला गोर म्हणून संबोधतात. सिंधू संस्कृतीच्या काळात या जमातीच्या अस्तित्वाचे संदर्भ सापडतात. गोरमाटी हे या देशाचे मूळ निवासी आहेत. बंजारा जातीचे प्राचीन कालीन संदर्भ आजही आहेत. बंजारांची स्वतंत्र जगावेगळी गोरवट (संस्कृती) आहे. वेशभूषा, रुढी, प्रथा, परंपरा, खानपान, संस्कार या सर्वांच्या संदर्भात गोरमाटी इतर जमातींपेक्षा विलग आहे. हजारो वर्षांपासून त्यांनी आपली स्वतंत्र गोरवट (संस्कृती) जपून ठेवली आहे.

लदेणी म्हणजे बैलाच्या पाठीवरुन माल वाहतूक करणे हा बंजारा गणांचा पूर्वीचा व्यवसाय होता. लदेणीसाठी आठ महिने ते भटकत असत. त्यामुळे त्यांना देशाच्या भूगोलाचे व रस्त्यांचे ज्ञान ज्ञात होते. म्हणून गोरमाटींना देशाचा वाटाडया म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण कोणता रस्ता कोठून कोठे जातो. तसेच रस्त्याने येणा-या अडचणी त्यांना माहीत होत्या. लदेणी करणारे त्यांचे वेगवेगळे गट एकमेकांना रस्त्याबाबत सूचना देत भारतभर भटकंती करीत असत.

बंजारा जातीची ज्याप्रमाणे स्वतंत्र गोरवट (संस्कृती) आहे, त्याचप्रमाणे त्यांचा वैशिष्टये पूर्ण इतिहास ही आहे. गोरमाटी मौखिक साहित्याने या ऐतिहासिक खुणा हजारो वर्षांपासून जतन करुन ठेवले आहेत. आज बंजारा जातीच्या ज्या काही ऐतिहासिक खुणा आढळतात, त्यावरुन काही बंजारा इतिहासकांरानी गोरमाटी इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र हा इतिहास लेखनाचा प्रयत्न अत्यंत स्थूल स्वरुपात आहे.

'भिमणीपुत्र' मोहन नाईक यांनी बंजारा जातीच्या इतिहासाच्या ऐतिहासिक संदर्भात असे लिहिले आहे की, ''आर्यांच्या आगमनापूर्वी भारतात जी संस्कृती नांदत होती ती नागवंशीय द्रविडीयांची संस्कृती होय. या द्रविडियांना अनार्य म्हणजे जे आर्य नव्हे असे संबोधिले जाते. वेदकालीन अनार्य दस्यु पणी हे हल्लीचे गोरमाटी बंजारा होय. याचाच अर्थ बंजारा जात हा मूळ भारतीय अनार्य होय. भारताच्या आदिम संस्कृतीतच त्यांची पाळेमुळे रुजलेली आहेत. त्यामुळेच भिमणीमुत्र मोहन नाईक यांनी गोरवटचे नाते अनार्यांशी जोडलेले आहे. तसेच 'गोरमाटी' हे पणीचे प्रतिनिधित्व सर्वाधिक करतात. हरप्पा संस्कृतीच्या निर्मितीत आणि जडणघडणीत पणी गणांचा सिहांचा वाटा होता. हे हरपणी या शब्दावरुन स्पष्ट होते.

हरप्पा संस्कृतीत शिवोपासक पणी या लोकगणाची संख्या सर्वाधिक असल्यामुळे 'हरप्पा' हे नाव या भूभागास पडले. असे भिमणीपुत्र मोहन नाईक यांनी स्पष्ट केले आहे. हे पणी दुसरे तिसरे कोणी नसून गोर बंजारा आहेत असेच त्यांना म्हणावयाचे आहे. त्यांच्या वरील स्पष्टीकरणावरुन हरप्पा नावाच्या भूभागावर राहणारा 'पणी' हा गण बंजारा गणाचे प्रतिनिधित्व करणारा असावा असे वाटते. कारण हरप्पाच्या दत्खननात सापडलेल्या पुरातत्वीय अवशेषांवरुन वरील मतास अधिक पुष्टी मिळते.

लोकरुढी व लोकपंरपरा बंजारा गणात असून गोरगणाच्या संस्कृतीची बीजे लोकरुढी पंरपरेत दडलेली आहे. यातून बंजारा गोरगणाचे अतरंग प्रतिबिंबित होतांना दिसते.

बंजारा गणात विविध सण-उत्सव प्रसंगी देवी देवतांच्या पूजा, कुलदैवत व पूर्वजाच्या नावाने पशूबळी देण्याची पध्दत आहे. गोर बंजारा जात प्रस्थापित जाती जमातीपेक्षा सांस्कृतिकदृष्टया व वेशभूषेच्या दृष्टिने पूर्णतः वेगळी आहे. सामाजिक पुर्नउत्थानासाठी संपूर्ण जीवन सर्मपित करणारे समाजाचे एक दृष्टे संत सेवालाल महाराज यांनी अनादी काळापासून समाज व संस्कृतीशी दुरावलेल्या बंजारा समाजाला जवळ आणण्याचा प्रयत्न केला.

अशाप्रकारे बंजारा लोकगणाची ही परंपरा अत्यंत प्राचीन आहे. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत या समाजात अनेक स्थित्यंतरे झालेली आहेत. ब्रिटिश राजवटीत या जातीचा लदेणी हा व्यापार बुडाला, भटकणारा लोकसमूह स्थिर होवू लागला. वसाहतीकरण सोबतच १९६० नंतर तांडयात अनेक स्थित्यंतरे होत गेली. देशाला स्वतंत्र मिळाले. भारतीय राज्यघटनेची निर्मिती झाली, हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे कार्य या घटकांनी समाज मनाचे सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय पर्यावरण बदलले.

भारतीय समाज व्यवस्थेत बंजारा जाती आणि एकूणच त्यांची संस्कृती देखील समान असतांना वेगवेगळया राज्यांमध्ये बंजारा समाजामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय बदल दिसून येते. सामाजिक आरक्षणाच्या बाबतीत तर फार मोठी तफावत दिसून येते. अशा वेगवेगळया पैलूं मध्ये विविधता असूनही समाज एक संघ राहिलेला आहे. परिवर्तनाच्या वाटेवर असतानांच या समाजाला विकासाची दिशा मिळणे गरजेचे आहे. आधुनिकीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या प्रवाहामुळे बदल झालेला असला तरी ख-या अर्थाने भक्कमपणे उभा राहिलेला नाही. आजही काही बाबतीत बंजारा जातीत मागासलेपणा दिसून येतो.

थॉमस फ्रिडमैन यांनी जागतिकीकरणाच्या संदर्भात असे म्हटले आहे की, आजचे जागतिकीकरण अधिक वेगाने पुढे जाणारे, तेजस्वी, स्वस्थ आणि व्यापक स्वरुपाचे आहे. अँथनी गिडेन्स यांच्या मते. 'जागतिकीकरण ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ही एक

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया आहे. समाजशास्त्रज्ञ लेवीस स्ट्रॉस यांनी असे म्हटले आहे की, 'प्रत्येक संस्कृती आपल्या अंतर्गत सृजनात्मक शक्तीला बंधनापासून मुक्त करु इच्छिते आणि आपल्या पृथक जीवनाला त्यागून दुस-या संस्कृतीशी संपर्क स्थापित केला पाहिजे असा प्रयत्न करते' एक प्रकारे लेवीस स्ट्रॉस यांनी जागतिकीकरणाचे समर्थनच केलेले दिसून येते. जागतिकीकरणात संस्कृतीतील घटक एका समाजापासून दुस-या समाजापर्यंत शीघ्रगतीने संक्रमित होत आहेत. या प्रक्रियेतूनच विश्व समाज निर्माण होत आहे.

लदेणी करणारा बंजारा जाती समूह ते आजच्या परिवर्तनाच्या प्रवाहातील बंजारा जाती समूह या प्रक्रियेतील बदल समजून घेण्याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भक्कम अशी संस्कृतीच्या बळावर विश्वातील संपुर्ण समाजापासून स्वतंत्र अशी संस्कृतीची ओळख निर्माण करणारा बंजारा जातीची आज ही तीच संस्कृती टिकून आहे का? हे अभ्यासणे गरजेचे आहे. म्हणून या अनुषगांने देखील संशोधन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

उपरोक्त विवेचनावरुन बंजारा जातीची संस्कृती समजून येते. बंजारा जातीचे वर्तमानकालीन समाज जीवनातील बदल, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कतिक, राजकीय अशा अनेक क्षेत्रात बंजारा जातीचे झालेले परिवर्तन पाहण्यासाठी, विशेषतः यवतमाळ जिल्हयाच्या संदर्भात बंजारा जातीचा एक घटक या नात्याने "बंजारा जातीच्या सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास"- विशेष संदर्भ : यवतमाळ जिल्हा' या संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

संबंधित साहित्याचा आढावा (Review of Related Literature)

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे निश्चित झाल्यानंतर त्यांच्याशी संबंधित अधिक माहिती मिळविण्यासाठी विविध साहित्याचा आढावा घेणे गरजेचे असते. त्यामुळे संशोधकाला आपल्या संशोधनाचा आढावा घेतल्याने संशोधन कार्यास योग्य दिशा मिळेल आणि इतरांपेक्षा आपले संशोधन वेगळे व चांगले करण्याचा दृष्टिकोन मिळेल. या दृष्टिने संशोधकाने आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यावरुन संबंधित साहित्याचे व संशोधनाचे परिशीलन करण्यात आले आहे.

"बंजारा जातीच्या सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास" विशेष संदर्भ : यवतमाळ जिल्हा' हा विषय संशोधनासाठी हातळत असतांना बंजारा जातीची संस्कृती, रुढी, परंपरा आणि चालीरीती त्याच बरोबर बंजारा जातीचा सामाजिक,

सांस्कृतिक आणि आर्थिक तसेच शैक्षणिक व राजकीय इ. पैलूंचा अभ्यास करण्यात येईल. वर्तमानकालीन जीवनपध्दती म्हणजेच आधुनिकीकरण व जागतिकीकरणाच्या प्रवाहात बंजारा जातीची प्रमुख क्षेत्रातील विकासात्मक आव्हाने कोणती व कशी आहेत हे अभ्यासणे आवश्यक वाटते. आधुनिकीकरणाच्या प्रवाहात बंजारा जाती मध्ये निश्चितच बदल झालेला दिसून येतो. परंतु त्याची दिशा कोणती आहे हे देखील तपासणे गरजेचे आहे. बंजारा जातीची संस्कृती आणि परंपरा पिढयानपिढया चालत आलेल्या आहेत. आजच्या या प्रवाहात त्यामध्ये बदल झालेला आहे आणि हा परिवर्तन समाजासाठी किंवा समाजाच्या विकासासाठी उपयुक्त आहे का? हे देखील अभ्यासणे गरजेचे आहे. त्याकरिता हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

बंजारा जात ही आर्थिक आणि शैक्षणिक दृष्टिने एक मागासलेला समाज आहे. आजही बंजारा जातीत बराच मागासलेपणा आढळून येतो. स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारत सरकारने शिक्षणाची द्वारे सर्वासाठी मुक्त केली. मागास समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी सोयी सवलती निर्माण केल्या. याचा निश्चितच सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो. परंतू एकीकडे सकारात्मक परिणाम तर दुसरीकडे नकारात्मक परिणामही दिसून येतात. जसे की शिक्षणाची दारे खुली असतांना शिक्षणापासून वंचित राहण्याची संख्या ही वाढत चालली आहे. विशेषतः हे आपल्याला ग्रामीण समाजाच्या अध्ययनावरुन लक्षात येते. बंजारा जातीची शिक्षणातील परिस्थिती बिकट असतांनाही आज बंजारा जातीतील शिकलेली तरुण कर्तबगार मंडळी पुढे येऊ लागली आहे. शिक्षित वर्गाकडून आपल्या समाजावर, संस्कृतीवर त्यांच्या आर्थिक, सामाजिक जीवनावर साहित्य निर्माण करण्याचं काम देखील चालू आहे. त्यामुळे इतर समाजाला या समाजाचे अंतरंग कळण्यास निश्चितच मदत होणार आहे. या शिवाय समाजशास्त्र, सामाजिक मानवशास्त्राअंतर्गत देखील इतर संशोधकाकडून संशोधन होत आहे. हे संशोधन काही प्रमाणात शोध प्रबंधाच्या रुपात तर काही पुस्तकांच्या रुपात, लेखनाच्या रुपात, शोधनिबंध, कविता, काव्य अशा विविध स्वरुपात साहित्य निर्मिती होत आहे. बंजारा जातीवर अनेकांनी काही ना काही त्याच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती, रुढी, परंपरा, चालीरिती, अंधविश्वास, नातेसंबंध, विधिनिषेध, स्त्रीविषयक दृष्टिकोन, स्त्रियांची स्थिती, सामाजिक गतिशीलता, परिवर्तन इतर समाजाशी सामजंस्य, बदलत्या काळाशी समायोजन बंजाराच्या समस्या अशा अनेक पैलूवर लिखाण झालेले आहेत आणि आजही चालू आहेत. यातून महत्वाची बाब जी साध्य झाली आहे, ती म्हणजे या समाजाचे अंतरंग व बर्हिरंग व्यक्त होऊ लागल्याने इतर समाजाला बंजारा जातीचे वैधानिक आकलन होण्यास मदत होत आहे, त्यामुळे साहजिकच सामाजिक विनिमयाची गती त्यातून वाढत आहे.

यापूर्वी बंजारा समाजावर अनेक संशोधन झाली आहेत. त्यापैकी काही संशोधनाचा निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

प्रा. मोतीराज राठोड यांनी मराठी ग्रथांतील 'तांडा संस्कृती' व हिंदी ग्रथांतील 'बंजारा समाज' या ग्रथांत शासकीय धोरणाचे विश्लेषण केले आहेत. तसेच समिक्षात्मक आलोचना करतांना बंजारा जमातीतील वर्गीकरणाचे विश्लेषण करुन विविध राज्यांच्या शासनाने बंजारा जातीला वेगवेगळया वर्गात वर्गीकृत करुन हा समाज विविध नावाने कसा ओळखला जातो. याचे विश्लेषण केले आहे.

ग. ह. राठोड लिखित 'गोर बंजारा समाजाची ओळख' या ग्रथांत गोर बंजारा समाजाची ओळख, बंजारा समाजाचे स्वरुप, विविध संबोधने, ब्रिटिश काळ, स्वातंत्र्यपूर्व कालीन नावे, जीवनशैली, आर्य अनार्याशी संबंध, शासकीय धोरण, समाजाचे गुण-दोष, समाजाचे जागतिक स्वरुप, पशुवनस्पती, सभ्यता, गोर, वेशभुषा, अलंकार, व्यवसाय, राहणीमान, राष्ट्र विकासात योगदान, त्यांचे देशातील स्थान, विदेशी संबंध त्यांची एकूण सर्व क्षेत्रातील वाटचाल, शासनाचे धोरण व समाजाचे भविष्य या बाबतीत सविस्तर माहिती देणारे हे ग्रंथ आहे.

डॉ. श्रीराम शर्मा यांनी आपल्या 'बंजारा समाज' या ग्रंथात बंजारा समाजाच्या सामाजिक जीवनावर विस्ताराने प्रकाश टाकला. या संशोधनात बंजारा समाजाची उत्पत्ती, विवाह, धर्म, आर्थिक बाजू अशा विविध पैलूंला हाताळले आहे. त्यांचा हा अभ्यास अनुभविक स्वरुपाचा आहे ज्याला आपण Empirical Research म्हणतो.

प्रा. भाऊ छन्नू राठोड ' मराठवाडयातील बंजारी लोकगीत व दंतकथा यांचा सामाजिक व वाङःमयदृष्टया चिकित्सक अभ्यास' या शोधप्रबंधात तीन स्थित्यंतरे सांगितली. ज्या १) लदेणीच्या व्यवसायातील २) बंजारा भ्रमणाची कक्षा विस्तारणे ३) बंजारा समाज स्थायी होत आहे. तसेच बंजारातील आदिमता, अज्ञान, तांडयाचे पृथ्यकत्व, दारिद्रय, अंधश्रध्दा, कालबाहय रुढी यामुळे परिवर्तनाची गरज आहे, असे निष्कर्ष मांडले आहेत.

डॉ. रुक्मिणी नाईक पवार यांनी आपल्या 'Sociological Study of Banjara Community through Ethnomethodological approach' या शोधप्रबंधात आर्थिक विकासाच्या योजना, समाजाच्या नविन प्रवाहासोबत समायोजन साधण्याचे कौशल्य, विकासाच्या या बाबींचा ऊहापोह केला आहे.

प्रा. प्रभाकर वाय. आंबेकर यांनी आपल्या 'द लभाण' समाजशास्त्रीय विश्लेषण या शोधप्रबंधामध्ये - बंजारा कुटुंब पध्दतीतील नातेसंबंधातील झालेले परिवर्तन, स्त्रियांच्या दर्जातील आलेले परिवर्तन, धार्मिक, आर्थिक संस्थेतील परिवर्तन, राजकीय परिवर्तन,

आरक्षण धोरणातील परिवर्तन यांचा अभ्यास करुन सामाजिक-संरचनात्मक परिवर्तन होत आहे असे निष्कर्ष मांडले आहे.

उपरोक्त संशोधन साहित्याचा आढावा घेतल्या नंतर असे लक्षात येते की, पारंपारिक जीवन पध्दतीच्या आधारावर हे संशोधन झालेले आहेत. परंतु आजच्या आधुनिक आणि जागतिकीकरणाच्या प्रवाहात बंजारा जातीतील परिवर्तन समजून घेणे गरजेचे आहे. करिता या विषयावर संशोधन करण्याचे मानस आहे.

प्रस्तुत संशोधनाचे महत्व :

बंजारा जातीवर आजपर्यंत अनेक संशोधने झाली आहेत. परंतू आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रवाहात बंजारा जातीच्या सामाजिक-आर्थिक, आणि सास्कृतिक परिवर्तनाचा अभ्यास करण्यात आलेला नाही. या प्रवाहात बंजारा जातीच्या संस्कृतीचे आदर्श आणि वर्तमानकालीन जीवन पध्दतीतील परिवर्तन योग्य दिशेने आहे असे म्हटल्या जाते. परंतु बंजारा जातीतील परिवर्तन हे वास्तव आहे का? हे पाहण्यासाठी यवतमाळ जिल्हयातील बंजारा जातीचे समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे, कि ज्यामुळे समाज विकासाच्या प्रवाहात बंजारा जातीच्या भविष्यातील निष्कर्ष कदाचित शक्य होईल.

भारतातील बंजारा समाजाचे आरक्षण हे समांतर नसून काही ठिकाणी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त-जाती, भटक्या-जमाती, इतर मागास वर्ग आणि काही ठिकाणी खुला प्रवर्गात देखील समावेश होतो. महाराष्ट्रात बंजारा समाज विमुक्त जातीचे प्रतिनिधित्व करीत आहे. बंजारा जात समूह हा कोणत्या प्रक्रियेला अधिक महत्व देतो. या संदर्भात बंजारा जातीचा विकास अवलंबून आहे. दुस-या शब्दात सांगावयाचे झाल्यास बंजारा जातीला जागतिकीकरणाच्या प्रवाहात, वर्तमानकालीन प्रक्रियेत स्वतःला आणून विकास साध्य करता येतो. या दृष्टिकोनातून बंजारा जातीचा अभ्यास करणे संशोधनकर्त्याला महत्वाचे वाटते. या करीता संशोधनकर्त्याने यवतमाळ जिल्हयातील बंजारा जातीचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय तसेच वर्तमानकालीन समाज जीवनाची परिस्थिती या सर्व घटकामध्ये झालेल्या परिवर्तनाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

भारतात चालणा-या सामाजिक सुधार चळवळी, आदिवासी चळवळी, बंजारा सेवा संघ द्वारा केले जाणारे प्रयत्न, कायघान्वये केलेल्या तरतूदी इत्यादी संदर्भातील बाबी भारतीय आदिवासी जमाती मध्ये मूलभूत सुधारणा तसेच परिवर्तन घडवून आणत आहे. या परिवर्तनाची प्रक्रिया बंजारा जाती पर्यंत पोहचली आहे. या दृष्टिने बंजारा जातीत

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे कसा व किती प्रमाणात परिवर्तन होतो आहे याचा सखोल अभ्यास करुन जाणून घेणे अतिशय महत्वाचे आहे. यवतमाळ जिल्हयातील गोर बंजारा जाती परिवर्तनासाठी नेहमीच तत्पर आहे. यावरुन या संदर्भात देखील प्रस्तुत संशोधनाचे महत्व अधिकच वाढीस लागले आहे. म्हणून बंजारा समाजाचा प्रतिनिधी या नात्याने "बंजारा जातीच्या सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास" (विशेष संदर्भः यवतमाळ जिल्हा) हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :

१. बंजारा जातीची ऐतिहासिक पाश्वभूमी जाणून घेणे.
२. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत बंजारा जातीचे सामाजिक परिवर्तन जाणून करणे.
३. बंजारा जातीच्या आर्थिक जीवन पध्दतीच्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.
४. बंजारा समाजाच्या संस्कृतीतील परिवर्तनाचा अभ्यास करणे.
५. आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रवाहामुळे बंजारा जातीत झालेल्या स्थित्यंतरांचा अभ्यास करणे.
६. बंजारा जातीच्या शैक्षणिक क्षेत्रातील परिवर्तनाचा अभ्यास करणे.

गृहितकृत्ये (Hypothesis) :

संशोधनाची उद्दिष्टे समोर ठेवून अध्ययनात जी गृहितकृत्ये मांडलेली आहेत ती पुढील प्रमाणे :

१. बंजारा जातीने स्थैर्य निर्माण केले आहे.
२. आधुनिकतेमुळे बंजारा जातीच्या जीवन पध्दतीत बदल झालेला आहे.
३. बंजारा जातीच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झालेली आहे.
४. आधुनिकीकरणामुळे बंजारा जातीच्या रुढी, परंपरा व संस्कृतीत बदल झालेला आहे.
५. आधुनिक प्रवाहामुळे बंजारा जाती समूह विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे.
६. बंजारा जातीचा शिक्षणामुळे वैज्ञानिक दृष्टिकोण विकसित झाला आहे.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा क्षेत्रापुरतीच मर्यादित राहणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पुसद, महागांव, उमरखेड आणि दिग्रस या तालुक्यातून वेगवेगळया तांडयांची संशोधनासाठी निवड केली जाणार आहे. यवतमाळ जिल्हयात एकूण सोळा तालुके आहेत. यात यवतमाळ, आर्णी, कळंब, राळेगाव, नेर, घांटजी, वणी, पांढरकवडा, दारव्हा,

दिग्रस, पुसद, महागांव, उमरखेड, झरी-जामणी, बाभुळगांव, मारेगाव ही तालुके यवतमाळ जिल्हयात आहेत. पुसद, महागांव, उमरखेड आणि दिग्रस या तालुक्यात बंजारा तांडयाची संख्या इतर तालुका पेक्षा जास्त असून प्रस्तुत संशोधनाकरीता विषयानुरुप तीनशे (२००) उत्तरदात्यांची निवड केली जाईल.

या संशोधनासाठी यवतमाळ जिल्हा हा विश्व म्हणून निवडलेला आहे. या जिल्हयातील पुसद, महागांव, उमरखेड आणि दिग्रस या तालुक्यातील बंजारा तांडयातून तिनशे उत्तरदात्यांची नमुना निवड करुन संशोधन केले जाणार आहे. अशा समग्रातील प्रत्येक उपसमग्रातून सहेतूक नमुना निवड पध्दतीने प्रत्येक तालुक्यातून समान तांडयाची निवड करुन नंतर एककांचा नमुन्याच्या आकारात अंतर्भाव करण्यात येणार आहे.

अभ्यासाचे क्षेत्र यवतमाळ जिल्हा असून या जिल्हयातील “बंजारा जातीच्या सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास” या संशोधन विषयांच्या अनुषंगाने संशोधन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हा अभ्यास पूर्ण करण्यासाठी संपूर्ण क्षेत्रातील माहितीचा आधार घेवून प्रस्तुत शोधप्रबंध सादर केले जाईल.

नमुना निवड पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी यवतमाळ जिल्हयातील एकूण सोळा तालुक्याची यादी तयार केली जाईल. पुसद, महागांव, उमरखेड आणि दिग्रस तालुक्यातील गावाच्या साधनसुचीसह नकाशे प्राप्त केले जातील. गावाच्या सुचीतुन जिथे बंजारा जातीचे तांडे आहेत. त्यांची सुची देखील तयार केली जाईल. या करीता सहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर केला जाईल.

संशोधन कर्त्याने यासाठी सोबतच नमुना निवडीतुन विषयानुरुप प्रतिनिधिक स्वरुपाचे जे तांडे येतील त्यातील बंजारा जातीतील विषयानुरुप उत्तरदाते पुसद, महागांव, उमरखेड आणि दिग्रस या तालुक्यातून तथ्य संकलन करीत असताना सहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन संशोधन करण्याचा प्रयत्न केले जातील.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आलेली आहे. कारण या पध्दतीमुळे संकलित तथ्यांचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून संशोधन विषयाचे वैशिष्टये व स्वरुप अभ्यासले जातील. त्यामुळे हा संशोधन आराखडा या संशोधनात उपयुक्त ठरतो. संशोधन विश्व हे यवतमाळ जिल्हयातील सर्व बंजारा समुदाय असणार आहेत.

तथ्य संकलनाची साधने :

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

१. प्राथमिक स्त्रोत :

बंजारा तांडयातील बहूतांश लोकांचे शिक्षण झालेले नसते म्हणून त्यांच्या कडून मुलाखत अनुसूची आणि निरीक्षण तंत्राच्या सहाय्याने तथ्य संकलित केली जाणार आहेत.

२. दुय्यम स्त्रोत :

प्राथमिक स्त्रोताला पुष्टी देण्यासाठी दुय्यम स्त्रोतात, शासनाने अंवलंबिलेल्या निर्णय, योजना, आयोग, उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित आकडेवारीचाही विचार करण्यात येणार आहे. शासकीय दस्ताऐवज त्यात जनगणना अहवाल, शासकीय सर्वेक्षणे, संशोधन प्रबंध, विविध पुस्तके, ग्रंथसूची, विश्वकोश, अप्रकाशित शोधनिबंध, मासिके, त्रैमासिके व पाक्षिके यांचा अवलंब केला जाणार आहे.

प्रकरण योजना

प्रकरण पहिले : बंजारा जात समूहाची - उत्पत्ती आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रकरण दुसरे : बंजारा जातीची सामाजिक रचना आणि सामाजिक व्यवस्थेतील परिवर्तन

प्रकरण तिसरे : बंजारा जातीची लदेणी व्यवस्था आणि समकालीन आर्थिक जीवन पध्दतीतील परिवर्तन

प्रकरण चौथे : बंजारा जातीची संस्कृती आणि सांस्कृतिक जीवन पध्दतीतील परितर्वन

प्रकरण पाचवे : बंजारा जातीत झालेल्या परिवर्तनाचे विश्लेषण व निर्वचन

प्रकरण सहावे : समारोप, निष्कर्ष, शिफारशी

संदर्भग्रंथ सूची :

१. भांडारकर, पु. ल. (१९८७), 'सामाजिक संशोधन पध्दती': साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

२. पवार,जीवन (२००६) 'बंजारा समाजाच्या राजकीय जाणिवांचे विश्लेषणात्मक अध्ययन' अप्रकाशित शोधप्रबंध.

३. आहूजा, राम. (२००५),'सामाजिक सर्वेक्षण एवं अनुसंधान', रावत पब्लिकेशन्स, जयपूर.

४. दोषी, एस. एल. व पी. सी. जैन. (२००७) 'भारतीय समाज संरचना और परिवर्तन', नेशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर.

५. नाडगोंडे गुरुनाथ. (१९९७), 'ग्रामीण समाजशास्त्र' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

६. पवार, रामकोटी (२०१२) 'बंजारा समाज ऐतिहासिक परिप्रेक्ष्य' जवाहर पुस्तकालय, मथुरा, उत्तरप्रदेश.

७. राठोड, मोतीराज. (१९९८) गोरमाटी, बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद.

८. गारे, गोविंद. (१९९३) 'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती', अमृत प्रकाशन, औरंगाबाद.

९. राठोड, मोतीराज, 'गोर बंजारा वंशाचा इतिहास, कोपरी ठाणे, पूर्व संस्करण, नागपूर.

१०. चव्हाण, यशंवत (२००९) 'बिड जिल्हयातील बंजारा समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास' अप्रकाशित शोधप्रबंध.

११. राठोड, होमराज (२०१३) 'अंधविश्वासाचा सामाजिक जीवनावर होणारा परिणाम-बंजारा समाजाच्या विशेष संदर्भात' अप्रकाशित शोधप्रबंध.

१२. फुलवाडकर, दिनानाथ, (२००९) 'बोलियाँ एवं बोली कोश' समता प्रकाशन, कानपूर.

१३. जाधव, नारायण (२०१२) 'बंजारा समाजातील अंधश्रध्दा आणि त्यांचे सामाजिक व आर्थिक मागासलेपण-एक चिकित्सक अभ्यास- संदर्भ नांदेड जिल्हा' अप्रकाशित शोधप्रबंध.

१४. राठोड, सुभाष (२०१३) 'लमाणी बोली - भाषा का समाज भाषा वैज्ञानिक अध्ययन', अतूल प्रकाशन, कानपूर.

१५. राठोड, ग. ह. (२०१२) 'गोर बंजारोंका गौरवान्वित इतिहास एवं गुलामीकी समीक्षा', राष्ट्रीय बंजारा परिषद, पुणे.
१६. राठोड, अमरसिंग, (२०१४), 'मूलनिवासी बंजारा', वेद मुद्रा प्रकाशन, अमरावती.
१७. कुमार, एम. (२००९) 'आदिवासी संस्कृती एवं राजनीति', विश्वभारती प्रब्लिकेशन्स, नवी दिल्ली.
१८. पवार, रुक्मिणी. (२००५) 'बंजारा लोकजीवन पध्दती' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
१९. खैरनार, दिलीप (२०११) 'प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी' डॉयमंड पब्लिकेशन्स, पुणे.
२०. कुमार, एम. (२००९) 'आदिवासी संस्कृती एवं राजनीति', विश्वभारती प्रब्लिकेशन्स, नवी दिल्ली.
२१. फुलझेले, राजेंद्र (२०१३), 'मानववंश आणि मलूह (सिंधू) संस्कृती', अपूर्वा प्रकाशन, नागपूर.
२२. Wandkhede, Vandana (2005), 'Banjara Costume in Maharashtra. Ph. D. Thesis.
२३. Deogaonkar, S. G., and Shailaja, (1992), 'The Banjara', Concept Publishing Company, New Delhi.

संशोधक

प्रा. राठोड ईश्वर लक्ष्मण
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब जि. उस्मानाबाद.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. गायकवाड एस. पी.
समाजशास्त्र विभागप्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय, लातुर.